# बालशिक्षणाच्या भारतीय ब्रँड ॲम्बेसिडर

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

शाळेच्या पूर्वप्राथमिक विभागातील छोट्या विद्यार्थ्यांच्या खेळात त्या सहज रमतात, मात्र त्यासह बालशिक्षण विषयाबाबत जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांचे नेतृत्व कौशल्यही दिसून येते. पूर्वप्राथमिक विभागातील शिक्षिका ते 'अमेरिकेतील वर्ल्ड फोरम ॲण्ड अर्ली चाइल्डहूड केअर सेंटर'सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या भारतीय ब्रँड ॲम्बॅसिडर आणि मार्गदर्शक हा विशाखा देशपांडे यांचा प्रवास थक्क करणारा आहे.



ठाण्याच्या विशाखा देशपांडे यांनी लहान मुलांमध्ये रमणारे क्षेत्र म्हणून पूर्वप्राथमिक शिक्षणाची निवड केली. 'अर्ली चाइल्डहूड केअर ॲण्ड एज्युकेशन अर्थात बालशिक्षण' या विषयात मुंबई विद्यापीठातून त्यांनी पदवी घेतली. ए. के. जोशी विद्यालयात २१ वर्षे पूर्वप्राथमिक विभागात शिक्षिका तसेच विभाग प्रमुख असा विविध पदांवर नोकरी करतानाही संशोधनाची आवड त्यांनी मागे पडू दिली नाही. ग्रामीण, शहरी अशा विविध भागांचे सर्वेक्षण त्यांनी केले. महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे काम करतानाच त्यांनी परिषदेच्या ठाणे शाखेचा पाया रचला. ग्राममंगल संस्थेच्या माध्यमातून आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी प्रयत्न केले. मात्र बालशिक्षण हे शास्त्रीय दृष्टिकोनातून व्हावे, ताणविरहित शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावेत, असा विचार मांडत परिषदेतर्फे त्यांनी संशोधन अभ्यासगट सुरू केला. खेड्यांपासून शहरांपर्यंत बालशिक्षण विषयात काम करत मुलांचा विकासासह शिक्षकांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला. या अभ्यासक्रमाचा स्वीकार अनेक शाळांनी केला. तब्बल चार हजारांहून अधिक शिक्षकांना त्यांनी पूर्वप्राथमिक अभ्यासक्रमाची प्रशिक्षणे दिली आहेत. फोरमतर्फे देण्यात येणाऱ्या 'प्रॉमिसिंग इमर्जिंग लीडर ऑफ ग्लोब' या पुरस्काराच्या त्या मानकरी ठरल्या आहेत. संशोधन आणि अभ्यासाच्या आधारे पूर्वप्राथमिक विभागातील 'करिक्युलम डेव्हलपमेंट' या विषयासाठी जागतिक समितीची निवड करण्यात आली असून त्याच्या नेतृत्वाची धुरा सध्या त्या समर्थपणे सांभाळत आहेत.